# प्रेसनोट

दि.१६/०३/२०२२

**सजा - म्हाळुंगे, आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे येथील तलाठी व खाजगी इसमावर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | चाकण पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७, ७अ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - वर्षा मधुकर धामणे, वय - ४५ वर्षे, पद - तलाठी, सजा - म्हाळुंगे, अतिरिक्त कार्यभार आंबेठाण ता. खेड, जि. पुणे.<br>२) खाजगी इसम - अकबर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- ( तीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- (वीस हजार रूपये) |

पडताळणी दिनांक - ०५/०३/२०२२, ०८/०३/२०२२, १०/०३/२०२२, ११/०३/२०२२
सापळा दिनांक :- १६/०३/२०२२.
ठिकाण :- तलाठी कार्यालय आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी सन २०१७ साली खरेदी केलेल्या म्हाळुंगे येथील जमिनीच्या सातबारा नोंदीसाठी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांनी सन २०१७ साली म्हाळुंगे येथील खरेदी केलेल्या जमिनीच्या सातबारा नोंदीसाठी आरोपी क्र.०२ यानी सुरवातीला १ लाख रूपये लाचेची मागणी केली. आरोपी लोकसेवक क्र.०१ यांनी ३० हजार रूपयांची लाच मागणी करून तडजोडीअंती २० हजार रूपये लाच रक्कम स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक ज्योती पाटील तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.